## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य खंडपीठ पुणे यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम , २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार

---

तक्रार क्रमांक -३०/२०२३/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे

| तक्रारदार | उत्तरवादी |
|---|---|
| रामचंद्र विठ्ठल साबळे | प्राचार्य, सर परशुराम भाऊ महाविद्यालय पुणे |

(आदेश दिनांक - १२.०५.२०२६)

तक्रारदार यांचा कलम-१८ अंतर्गत तक्रार अर्ज दि. १०.०१.२०२३ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झाला आहे. तक्रारदार यांनी या तक्रार अर्जाद्वारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनूसार जन माहिती अधिकारी , प्रथम अपिलीय अधिकारी यांची माहिती प्रदर्शित केली नाही, अशी तक्रार केली आहे .

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या कायद्याच्या अंमलबजावणी संदर्भात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक, क्रमांक -अहत -१००८/ प्र.क्र-१८/०८/११-अ दि. १५ मे २००८, शासन आदेश क्रमांक केमाअ-२००९/६३१/प्र.क्र.२६७/०९/सहा दि. २४.०७.२००९ व वेळोवेळी निर्देश दिले आहेत. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४ च्या अंमलबजावणी संदर्भातही सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र- रामाआ २०१९/प्र.क्र.१८/सहा दिनांक ४ मार्च २०२४ च्या शासन परिपत्रकांद्वारे सविस्तर सूचना दिल्या आहेत.

तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने वरील सूचना नुसार तात्काळ कार्यवाही करून केलेल्या कार्यवाही बाबत तक्रारदार यांना कळविण्यात यावे असे निर्देश प्राचार्य, सर परशुराम भाऊ महाविद्यालय पुणे, यांना देण्यात येत आहेत.

आदेश

वरील निर्देशासह सदर तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ पुणे

तक्रार क्रमांक - ३०/२०२३/पुणे जावक.क्र - 2284 दिनांक 13/5/2026.